दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक २९७ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.२१ जानेवारी २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## राज्यात पुन्हा शाळेची घंटा वाजणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे राज्यात दिवसाला मोठ्या प्रमाणात रुग्णांची संख्या वाढत असताना राज्यातील शाळा १५ फेब्रुवारीपर्यंत बंद करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. पण, आता शाळा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी यासंदर्भात माहिती दिली. राज्यात २४ तारखेपासून १ ली ते १२ वी पर्यंतच्या शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे वर्षा गायकवाड यांनी सांगितले.

वाढत्या कोरोना प्रादुर्भावामुळे राज्यात सरकारने १५ फेब्रुवारीपर्यंत शाळा बंद ठेवण्याचे आदेश दिले होते. आता २४ जानेवारीपासून पुन्हा शाळा सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, स्थानिक प्रशासनाला त्याचे अधिकारही देण्यात आले आहेत. मुख्यमंत्र्यांनी शालेय शिक्षण विभागाच्या प्रस्तावाला दिली मंजुरी, त्यामुळे सोमवारपासून राज्यात पुन्हा शाळेची घंटा वाजणार आहे, असेही वर्षा गायकवाड यांनी म्हटले.

# राज्य सरकारच्या नैना प्रकल्पाविरोधात शेतकरी एकवटले

## खा.राजू शेट्टी, आ.जयंत पाटील, आ.बाळाराम पाटील यांच्यासह दिग्गज नेत्यांनी हजेरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**नैना प्रकल्पग्रस्त शेतकरी बांधव यांच्या जमिनीबाबत राज्य सरकारच्या आणि सिडकोच्या अधिपत्याखाली येणाऱ्या नैनाने अन्याय केला असल्याच्या विरोधात पनवेल तालुक्यातील शेतकरी बांधव एकवटले. आज तालुक्यातील खानाव याठिकाणी असलेल्या स्वप्नपूर्ती चित्रनगरी येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी, आ.जयंत पाटील, आ.बाळाराम पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.**



पनवेल परिसरात नैना विरोधाची आग धगधगत आहे. नैना म्हणजे केवळ बिल्डरांचा विकास मात्र शेतकऱ्यांना भकास करणारे आहेत. यावेळी नैनाविरोधात एकत्र लढलो तर नक्कीच यश मिळेल. असे ॲड. विजय गडगे यांनी सांगितले. तर सांगडे येथील स्मशानभूमी भोकरपाडा येथे काढण्यात आलेलं आहे. त्यामुळे येथील प्रेत २० किलोमीटरवर आणायच का ? अधिवेशनात आमदार नैनाचा प्रश्न उपस्थित करत नसतील तर रायगड मधील आमदार अधिवेशनात जातात कशाला ? नैनामुळे सध्या घर बांधताना देखील भीती वाटत आहे. सिडको धंदा करत आहे, व राजकीय पुढारी विकले गेले आहेत. त्यामुळे आपल्या गावाचा विकास आपण करू शकतो.

नैनामध्ये ज्या गावाची जागा गेली आहे त्यांना त्याच गावात जागा द्या अन्य गावात जागा कशाला देता, हे सर्व बेटरमेंट चार्ज मिळण्यासाठी केले जात असल्याचा आरोप या सभेत करण्यात आला. आपला फायदा करून घ्यायचा असेल तर संघटना मजबूत झाली पाहिजे. घरात बसून राहिलो तर नुकसान होईल, आपण सारे पेटून उठलो पाहिजे आणि या सरकारला घाम फोडला पाहिजे असे मत व्यक्त करण्यात आले. नैनाचा कारभार नियोजनशून्य असल्याचा आरोप शेतकऱ्यांच्यावतीने करण्यात येवून गेल्या आठ वर्षापासून एकही वीट रचली नसल्याचे सांगितले. लवकरच काही गावांमध्ये शेकडो घरे तुटणार आहेत, याविरुद्ध आवाज उठवायला हवा. शासन झोपडपट्टीत राहणाऱ्या नागरिकांना घरे देत आहेत मात्र घरात राहणार्यांना उध्वस्त करून झोपडीत राहायला पाठवणार आहे का असा सवाल यावेळी उपस्थितांमधून राज्य सरकारला करण्यात आला.

प्रकल्पग्रस्त, स्थानिक, भूमीपुत्रांना संपवण्याचाच प्रयत्न गेल्या काही वर्षापासून 'नैना'चा देखील सुरू आहे. येत्या काळात होलिकेप्रमाणे 'नैना' देखील नेस्तनाबूद झाल्याशिवाय रा- हणार नाही. आपल्या रोजीरोटीवर, व्यवसायावर, पोटापाण्यासाठी उभारलेल्या धंद्यांना उद्ध्वस्त करण्याचे नियोजन करुन 'नैना'ने मोठी घोडचूक केली. स्थानिकांना डिवचल्यानेच आज घराघरात आणि प्रत्येकाच्या मनामनात 'नैना'विरोधात प्रचंड संताप आहे. गावोगावी सध्या लाँग मार्चसंबंधी होत असलेल्या बैठकांतून जनभावना स्पष्ट होत आहेत. शेतकर्यांच्या, स्थानिकांच्या हिताचा विश्वास देऊन 'नैना' ने शेतकर्यांची फसवणूक केली. स्थानिकांचे म्हणणेच ऐकून घेतले जात नाही. दडपशाही, हुकुमशाहीचे धोरण अवलंबले जात आहे. बळजबरीने शेतकर्यांच्या जमिनी हिसकावून घेण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे दिसत आहे. आमच्या जमिनीवर आम्ही मोठ्या मेहनतीने व्यवसाय उभे केले. पै-पै जमा केली, प्रसंगी कर्ज काढले. सबंधित ग्रामपंचायतीकडे रितसर कर भरत आहोत. संबंधित व्यवसाय चालवण्यासाठी लागणारे परवाने सरकारनेच दिले. मग आम्हाला अनधिकृत ठरवण्याचा अधिकार यांना दिला कुणी? असा सवाल सामान्य नागरिक विचारु लागला आहे.

'नैना'ला विरोध करण्यासाठी सुरूवातीलाच सर्वपक्षीय संघर्ष समिती स्थापन करण्यात आली आहे. अन्याय करणाऱ्यांविरुद्ध बंड केले पाहिजे. आवाज उठवला पाहिजे. तरच अन्याय करणारे संपुष्टात येतील. अशी शिकवण देशाचे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांनी दिली. हुतात्म्यांचे रक्त वाया जात नाही, ते वाया जाऊही द्यायचे नसते अशा शब्दांत एकीचे बळ दाखवण्याचे आवाहन भूमीपुत्रांना प्रकल्पग्रस्तांचे नेते वाघ दि. बा. पाटील यांनी केले. या शिकवणीची प्रत्यक्ष कृती करण्याची वेळ आज आली आहे. 'नैना' ला थोपवून लावण्यासाठी भूमिपुत्रांनी एकजुटीची भींत बांधण्याची तयारी सुरू केली आहे.

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष तथा खासदार राजू शेट्टी, विधान परिषद सदस्य आ.जयंत भाई पाटील, आ. बाळाराम पाटील, पन- वेल नगरपरिषदेचे माजी आदर्श नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, क्रांतिकारी सेवा संघाचे अध्यक्ष नामदेवशेठ फडके, सुरेश ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, नगरसेवक गणेश कडू, प्रज्योती म्हात्रे, अनुराधा ठोकळ, रायगड जिल्हा परिषद सदस्य विलास फडके, पंचायत समिती सदस्य स्वप्नील भुजंग, वामन शेळके, सुभाष भोपी, सुरेश पवार, राजेश केणी, अनिल ढवळे, नरेंद्र भोपी, नारायण पाटील, जगन फडके, सुदाम वाघमारे, बाळाराम फडके, डि के भोपी, बबन फडके, अनिल ढवळे, शेखर शेळके, सुरेश पाटील, रामचंद्र फुलोरे आदींसह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मुंबईचा भार कमी करण्यासाठी नवी मुंबई उभी राहिली. तेव्हा स्थानिक आगरी - कोळी भूमीपुत्रांच्या जमिनी सिडकोने कवडीमोल भावाने खरेदी केल्या. त्याबदल्यात आपल्याला काय मिळाले? हे जरा मागे डोकावून पाहिल्यास समजेल. आता नवी मुंबई देखील कमी पडू लागल्याने तिचा भार कमी करण्यासाठी 'नैना'चा जन्म झाला. सिडको हे नाव जनमानसात प्रचंड बदनाम झाल्याने 'नैना' हे गोंडस नाव देण्यात आले. नवी मुंबईच्या निर्मितीमध्ये भूमीपुत्रांचा त्याग मोठा आहे. तिसऱ्या मुंबईच्या उभारणीमध्ये तर स्थानिकांवर अक्षरशः दडपशाही सुरू आहे. 'नैना' आली तेव्हा सक्तीचे कमीत कमी भूसंपादन असे धोरण ठरले होते. आता स्थानिकांचे व्यवसाय मोडीत काढून, लाखो रुपये भरण्यास सांगून त्यांच्या जमिनी सक्तीने विकत घेण्याचा डाव रचला जात आहे. गुन्हे दाखल केले जात आहेत, पोलीस बळाचा वापर केला जात आहे. जेणेकरुन स्थानिक हतबल होऊन गुडघे टेकतील. त्यामुळे गावोगावी 'नैना विरोधी असंतोष खदखदत आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीवर जाणूनबुजून आरक्षण टाकले असल्याचा आरोप केला जात आहे.**

## संक्षिप्त...

### शेजाऱ्याविरोधात सलमान खानचा कोर्टात मानहानीचा दावा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

जमिनीच्या व्यवहारात आपल्या कुटुबियांविरोधात अपमानास्पद टिपण्णी केल्याप्रकरणी अभिनेता सलमान खाननं त्याच्या शेजाऱ्याविरोधात अब्रुनुकसानीचा दावा केला आहे. सलमानने मुंबईच्या दिवाणी सत्र न्यायालयात पनवेल येथील फार्म हाऊसजवळील एका जमिनीच्या मालकाविरोधात हा अब्रुनुकसानीचा खटला दाखल केला आहे.

सलमाननं केलेल्या दाव्यानुसार, पनवेल येथील त्याच्या फार्महाऊस जवळच असलेल्या भूखंडाचे मालक केतन कक्कड यांनी एका यूट्युब चॅनलच्या माध्यमातून आपली बदनामी केली आहे. अशा प्रकारच्या अपमानकारक व्हिडिओला ब्लॉक करावं आणि तात्काळ हटवून टाकावं, असे निर्देश देण्याची विनंतीही सलमाननं या याचिकेतून केली आहे. त्यासोबतच सदर व्हिडीओतील अन्य दोन जणांना प्रतिवादी करण्यात आले आहे. याप्रकरणी ट्विटर, फेसबुक, यूट्युब आणि गुगललाही सलमाननं प्रतिवादी केले आहे. या याचिकेवर न्यायाधीश अनिल लद्दाद यांच्यासमोर गुरूवारी सुनावणी पार पडली. मुळात सलमान आणि एनआरआय असलेल्या कक्कडमध्ये जागेच्या अतिक्रमणावरून वाद आहे. मात्र कक्कड यानं केलेले हे सर्व आरोप वैयक्तिक पातळी- वरचे आहेत. चाईल्ड ट्रॅफिकिंग, ड्रग ट्रॅफिकिंग, बलात्कार, सुशांत सिंगला ठार मारले, अंडरवर्ल्डशी संबंध, लँड माफिया, दहशतवादी असे अनेक आरोप कोणताही पुरावा नसताना कक्कड यांच्याकडनं केले गेले आहेत. तसेच या प्रकरणाला धार्मिक रंगही देण्याचा प्रयत्नही केला गेला आहे. असा आरोपही सलमानच्यावतीनं कोर्टात करण्यात आला.

## श्रीवर्धनात राजकीय खळबळ ; बोर्लीपंचतन विभागातील शिवसैनिकांचा राजीनामा

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी - श्रीवर्धन तालुक्यामध्ये सद्या मोठया राजकीय घडामोडी घडत आहेत. तालुक्यातील बोर्लीपंचतन विभागातील शिवसेनेच्या काही महत्त्वपूर्ण पदाधिकाऱ्यांसह शिवसैनिकांनी आपल्या पदाचा राजीनामा देण्याचे जाहीर केले आहे. याबाबत शिवे- सेनेचे उपतालुकाप्रमुख सुकुमार तोंडलेकर यांनी बुधवारी बोर्लीपंचतन येथील आयोजित पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे.



तालुक्यातील जिल्हा परिषद गटातील बोर्लीपंचतन येथील जिल्हा परिषद सदस्या सायली तोंडलेकर, पंचायत समिती सदस्या मीना गाणेकर, उपजिल्हाप्रमुख श्यामकांत भोकरे, उपतालुकाप्रमुख सुकुमार तोंडलेकर, अनिल पवार या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह विभाग प्रमुख, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व शिवसैनिकांनी सर्वानुमते बुधवारी झालेल्या पक्षाच्या बैठकीत सामूहिक पदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती या पत्रकार परिषदेत देण्यात आली आहे.

शिवसेनेच्या बोर्लीपंचतन विभागाचे नेतृत्व करणारे सुकुमार तोंडलेकर यांनी सांगितलं की, सुरुवातीपासून तालुक्यात शिवसेनेचे काम करत असताना येथील शिवसैनिकांनी एक निष्ठेने कार्य केले आहे. विकास कामाच्या जोरावर येथील जनतेने शिवसेना पक्षाला कित्येक वेळा किंबहुना आजमितीला देखील अनेक निवडणुकीत यश मिळवून दिले आहे. मात्र, यावेळी बोर्लीपंचतन विभागातील दिघी, वडवली, वेळास, आदगाव, शिस्ते, बोर्लीपंचतन, भरडखोल अशा अनेक गावातून कोणताच विकास निधी आला नसल्याने येथील शिवसैनिकांच्यात नाराजी आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील जिल्हा परिषद बोर्लीपंचतन गटात चाळीसहून अधिक गावे येतात. या गावपाड्यात नियोजन मंडळ किंवा कोणत्याच योजनेचा निधी आला नाही. याची कैफियत सातत्याने शिवसेनेचे आमदार, नेते व पक्षनेतृत्वांपुढे मांडण्यात आली. तरी सुद्धा दुर्लक्ष झाल्याने सर्वानुमते सामूहिक राजीनामा देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

विकासाच्या मुद्यावर बोर्लीपंचतन परिसरातील कार्यकर्त्यांनी नाराजी दर्शवली असून, पदाधिकारी व शिवसैनिकांचे राजीनामे या आठवड्यात वरिष्ठांना धाडण्यात येतील असे सांगण्यात आले. त्यामुळे येथील राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता वर्तवली जात असून पुढील काळात श्रीवर्धन तालुक्यातील राजकारणात नेमक्या काय घडामोडी घडतात, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## जिल्हा सत्र न्यायालय ते पनवेल तालुका पोलीस स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर सम-विषम पार्कींग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जिल्हा न्यायालयात तसेच न्यायालयाच्या आजुबाजुला असलेले हॉस्पीटल आणि शासकीय कार्यालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी असल्याने आणि नागरिक न्यायालयासमोरील रस्त्यावर अस्ताव्यस्त वाहने पार्क करत असतात. त्यामुळे न्यायालयाच्या रोडवर होणाऱ्या वाहतूक कोंडीचा आणीबाणीच्या वेळी रुग्णवाहिका, आग्नशमन अशा अत्यावश्यक सेवेतील वाहनांना अडथळा होण्याची शक्यता असल्याने वाहतूक विभागाकडून जिल्हा सत्र न्यायालय लोखंडीपाडा, आशोकबाग आणि पनवेल तालुका पोलीस स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर सम-विषम पार्कींगची अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

पनवेल जिल्हा सत्र न्यायालय लोखंडीपाडा आणि आशोकबाग यांच्या मधून पनवेल तालुका पोलीस स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये आहे. सदर रस्त्यावर न्यायालय परिसर आणि आजुबाजुला खाजगी हॉस्पीटल, पोलीस उपआयुक्त कार्यालय, तालुका पोलीस ठाणे आदि महत्वाची शासकीय कार्यालये आहेत. तसेच न्यायालयाच्या समोरील बाजुस निलपार्क, शितल, गुरुवुल आणि पवन अशा चार रहिवाशी सोसायट्या देखील आहेत. पनवेल न्यायालयासमोरील रस्त्याची लांबी १५० मीटर आणि रुंदी ४० फुट असून न्यायालयात कामकाजासाठी येणारे नागरिक आपली चारचाकी आणि दुचाकी वाहने तेथील रस्त्याच्या दोन्ही बाजुस अस्ताव्यस्त पार्क करत असतात. त्याशिवाय न्यायालयाच्या आजुबाजुला असलेले हॉस्पिटल आणि शासकीय कार्यालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांची वर्दळ जास्त असल्याने त्याचा परिणाम न्यायालयाच्या रोडवरील वाहतूक कोंडीवर होत असल्याचे आढळून आले आहे. आणीबाणीच्या वेळी रुग्णवाहिका, अग्निशमन दल अशा अत्यावश्यक सेवेतील

.../२

## अल्पवयीन विवाहित सात महिन्याच्या गर्भवतीचा प्रसुती उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू

### पाली पोलीस स्थानकात पाच जणांवर गुन्हे दाखल

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील मौजे विकासवाडी पो. परळी येथील एका अल्पवयीन विवाहित गर्भवती (वय १४)हिला आपला हकनाक जीव गमवावा लागला आहे. अल्पवयीन गर्भवतीला प्रसूतीसाठी रुग्णालयात नेले होते, मात्र उपचारादरम्यान तिचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. याप्रकरणी पाच जणांवर पाली पोलिस स्थानकात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

यासंदर्भात सहाय्यक फौंजदार मोहन काळूराम म्हात्रे यांच्या फिर्यादीनुसार सविस्तर हकीकत अशी की सदर पीडितेचा विवाह फेब्रुवारी सन २०२० मध्ये सोनू पांडू पवार (५५), अलका मारुती हिलम (४८)यांनी सागर पवार (१८) या तरुणाशी संगनमताने लावून दिला होता. सदर पीडित १४ वर्षाची आहे, व आपण तिचे पती असून ती आपल्या अभिरक्षेत आहे हे माहीत असूनदेखील तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेऊन तिला पती सागर पवार याने गर्भवती केली. सदर पीडित तरुणी सात महिन्याची गर्भवती होती. दरम्यान प्रसूतीसाठी अलिबाग सिव्हिल रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. यावेळी पीडितेचा दुर्दैवी मृत्यू झाला. पाली पोलीस स्थानकात गु.र.नंबर ०६/२०२२ भा द वि स कलम ३७६(२), (जे )(के), ३७६(३)सह बालकांचे लैंगिक अपराधा पासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,६, १०, २१,सह बालविवाह अधिनियम २००६ चे कलम १० , ११ प्रमाणे सागर पवार, (१८) सोनू पांडू पवार (५५) , भुरी सोनू पवार(५५), मारुती गोपाळ हिलम(५२), अलका मारुती हिलम (४८)यांच्यावर पाली पोलीस स्थानकात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर प्रकरणाची खबर रजिस्टरी दाखल करून पुढील तपास विश्वजित काइंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली म .स. पो. नि तृप्ती बोराटे करीत आहेत.

बालविवाह करणे हा कायद्याने

.../२

## तळा नगरपंचायत निकाल ; दयानंद जानराव यांचा पराभव शिवसेनेच्या जिव्हारी

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायत निवडणुकीत प्रभाग क्रमांक ९ मध्ये मधली अळी, चंडिका कॉप्लेक्स परिसर याठिकाणी अनुसूचित जाती हे आरक्षण पडले यापूर्वी याच प्रभागातून शिवसेनेच्या उपनगराध्यक्ष सायली खातु या निवडून गेल्या होत्या या प्रभागात आरक्षण बदल्यामुळे या जागेवरून शिवसेनेने दयानंद जानराव यांना उमेदवारी दिली.दयानंद जानराव यांच्या प्रचाराची सर्व धुरा शिवसेना नेते लिलाधर खातू यांनी घेतली होती.

या प्रभागात शिवसेनेने चांगल्या प्रकारची विकासकामे केली असल्याने व खातू दाम्पत्याचा जनसंपर्क दांडगा असल्याने दयानंद जानराव निवडून येतील अशी खात्री शिवसेनेला होती जानराव यांना निवडून आणण्यासाठी शिवसेनेने खूप मेहनत घेतली परंतु शिवसेना उमेदवार जानराव यांचा केवळ एका मताने पराभव झाला राष्ट्रवादी काँग्रेसने खेळी करीत नवख्या उमेदवाराला जानराव यांच्या विरोधात उभे केले होते. अवघ्या एका मतानी झालेला हा पराभव शिवसेनेच्या जिव्हारी लागला आहे.

जानराव यांना शिवसेनेने उमेदवारी दिल्या नंतर त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसने पुष्पा नागे यांना उमेदवारी दिली . जानराव यांना ८७ तर नागे यांना ८८ मते मिळाली. २ मते नोटाला मिळाली. केवळ एका मताने झालेला हा पराभव शिवसेनेच्या जिव्ह- ारी लागला आहे. या प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेसने आधीपासूनच लक्ष घातले होते. या प्रभागात बहुजन समाजवादी पार्टी कडून सुरेंद्र शेलार निवडणूक लढवत होते परंतु त्यांना एकही मतदान झाले नसून त्यांचे डीपॉजिट जप्त झाले. शिवसेना यांच्या विरो- धात राष्ट्रवादीने जाणीवपूर्वक नवखा उमेदवार दिला या प्रभागात भाजपने उमेदवार दिला नाही. त्यामुळे जानराव आणि नागे यांच्यातच लढत झाली. यात जानराव यांचा पराभव झाला.

प्रभाग क्रमांक ९ हा शिवसेनेचा बालेकिल्ला समजला जातो या प्रभागात केवळ

.../२

# २८ जानेवारी 2022 रोजी शिवा संघटनेचा २६ वा वर्धापन दिन उदगीरमध्ये

**दै.रायगड नगरी । उरण**

वीरशैव लिंगायत समाजाच्या न्यायहक्कासाठी कार्यरत असणाऱ्या, वीरशैव लिंगायत समाजाचे देशातील सर्वात प्रभावी व आक्रमक समजल्या जाणाऱ्या शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचे शुक्रवार दि २८ जानेवारी २०२२ रोजी २६ वे वर्धापन दिन आहे.हा वर्धापन दिन रघुकूल मंगल कार्यालय, नांदेड बिदर रोड, शिवाजी चौका जवळ, उदगीर,जिल्हा लातूर येथे दुपारी १२:३० वाजता मोठ्या जल्लोषात साजरा होणार आहे.

वीरशैव लिंगायत समाजाची वज्रमूठ तयार करून समाजाला एकसंध बनवून समाजाला त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यात तसेच वीरशैव लिंगायत समाजात अस्मिता, स्वाभिमान, एकसूत्रता निर्माण करण्यात देशात, महाराष्ट्र राज्यात शिवा संघटनेची भूमिका अत्यंत महत्वाची राहिली आहे. अश्या या शिवा संघटनेच्या २६ व्या वर्धापन दिनाला वीरशैव लिंगायत समाज बांधवांनी, शिवा संघटनेच्या पदाधिकारी –कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्राध्यापक मनोहर धोंडे यांनी केले आहे.वर्धापन दिनाचे उदघाटन प्रा. मनोहर धोंडे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्ष म्हणून गुरुवर्य शंभूलिंग शिवाचार्य महाराज हावगी स्वामी मठ, उदगीर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सदर मेळाव्याला पाणी पुरवठा राज्य मंत्री महाराष्ट्र राज्य संजय बनसोडे हे मार्गदर्शन करणार आहेत.या मेळाव्याला तथा वर्धापन दिनाला वीरशैव लिंगायत समाजाचे शिवाचार्य, धर्मगुरू, शिवा संघटनेचे राष्ट्रीय, राज्यस्तरीय पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

दरवर्षी शिवा संघटनेच्या वर्धापन दिनी मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्यातून हजारो शिवा संघटनेचे कार्यकर्ते वर्धापन दिनाला हजर असतात. भारतात व भारता बाहेरही कुठेही वर्धापन दिन असला की तिथे शिवा संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते हजर असतात.दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वर्धापन दिनाला उपस्थित राहण्यासाठी, यंदा वर्धापन दिन उदगीरला असल्याने उदगीरला जाण्यासाठी मुंबई, ठाणे, नवी मुंबई, रायगड जिल्ह्यातून वाहनांची सोय केली असून शिवा संघटनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी, शिवभक्तांनी शिवा संघटनेच्या खालील पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावे.

# बेलपाडा येथील काँक्रीट रस्त्याचे प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते भूमिपूजन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

गव्हाण जिल्ह्यापरिषद सदस्य रविंद्र पाटील यांच्या निधीतून आणि ग्रामपंचायत सदस्य शिल्पा किरण कडु यांच्या पाठपुराव्यामुळे बेलपाडा येथील स्मशानभूमी ते वलडेश्वर मंदिर पर्यंतच्या रस्त्याचे भूमिपूजन पनवेल महानगर पालिकेचे विरोध–ीपक्ष नेते प्रितम म्हात्रे यांच्या शुभहस्ते पार पडले.

याप्रसंगी कोंग्रेस रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत यांची प्रमुख उपस्थीती होती. याप्रसंगी बोलताना जिल्हा परिषद सदस्य रविंद्र पाटील हे म्हणाले की, हा रस्ता आपण जिल्हा परिषद फंडातून करत असून बेलपाडा गावासाठी एक सुसज्ज स्मशानभूमी येत्या काही दिवसात मंजूर करून गावातील इतर नागरी समस्या लवकरात लवकर सोडविण्याचा प्रयत्न करू. याप्रसंगी उरण तालुका युवक अध्यक्ष रमाकांत म्हात्रे, गव्हाण विभाग युवक अध्यक्ष किरण कडू, मधूशेठ पाटील, मा. सरपंच तुकाराम ठाकुर, शशी म्हात्रे, प्रविण कडू, मदन घरत, सुशांत घरत, प्रकाश कडू, किरण कडू, किरण म्हात्रे, दत्ता पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आगामी काळात मराठा समाजाने कामे सुचविल्यास आपण ती करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करू : खा.सुनील तटकरे



**दै.रायगड नगरी । धाटाव**

रोहा नगरपालिकेच्या सुशोभन व विकास कामांमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे मोठे योगदान आहे. रोह्यात मराठा भवनासाठी शासनाकडे पालकमंत्री आदिती तटकरे व आ. अनिकेत तटकरे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे सुमारे ७५ लाख रुपयांचा निधी मंजूर होऊन साडेतीन हजार स्क्वेअर फूटाचे भव्य दिव्य मराठा भवन याठिकाणी उभे राहणार आहे. आगामी काळात मराठा समाजाने विविध कामे सुचविल्यास आपण ती करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करू असे रोखठोक प्रतिपादन रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांनी रोह्यात केले.

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या माध्यमातून रोहा शहरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन प्रामुख्याने भाटे सार्वजनिक वाचनालय पासून आसिफ कर्जीकर यांच्या घरापर्यंत चा रस्ता विकसित,दामजी मेघजी मिल पासून वरचा मोहल्ला रस्ता विकसित,श्री धावीर मंदिर ते सुंदर नगर मिल्लत नगर पर्यंतचा रस्ता विकसित करणे.यांसह मराठा समाज भवनाच्या भूमिपूजन सोहळ्या प्रसंगी ते व्यासपीठावर बोलत होते.विशेष म्हणजे मराठा समाजाने केलेल्या मागणीनुसार पालकमंत्री आदिती तटकरे, आ. अनिकेत तटकरे आणि खासदार सुनील तटकरे यांच्या पाठपुराव्यामुळे निर्माणाधीन मराठा समाज भवनाचे भूमिपूजन म्हाडा कॉलनी परिसरात मोठ्या दिमाखात पार पडले.यावेळी वुमन्स क्लब हाऊस म्हाडा वसाहत येथे पार पडलेल्या छोटेखानी कार्यक्रमामध्ये व्यासपीठावर आ. अनिकेत तटकरे, नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हा कार्याध्यक्ष मधुकर पाटील, नगरपालिकेतील सर्व नगरसेवक व राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

व्यासपीठावरून उपस्थितांना संबोधित करताना खा सुनील तटकरे पुढे म्हणाले की,आज भूमिपूजन करण्यात आलेले रोह्यातील मराठा समाज भवन मराठा तरुणांना मार्गदर्शक ठरेल तर महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांसाठी हे भवन उपयुक्त ठरेल असेही ते शेवटी म्हणाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी केले.तर समाजासाठी भव्यदिव्य वास्तुसाठी मंजूर केलेल्या भवनाबाबत मराठा समाजाच्या वतीने अध्यक्ष अमित उकडे यांनी खा. सुनील तटकरे यांचे आभार व्यक्त केले.


Date:-19/01/2022

**PUBLIC NOTICE**

Mr. Bhadresh Rajesh Shah, partner of Today Global Realtors Office at 1st floor, Ravriya City, Plot 8A, Sector 18, New Panvel, Navi Mumbai-400206, hereby publish notice in view to know to the public at large that we possess and or are otherwise sufficiently entitle to the landed properties being, laying and situated at revenue village Nandgaon, Taluka Panvel, Dist.- Raigad, which is described in the revenue records as follows

| Sr.No. | Survey No/Hissa No | Area in Sq. Mtrs |
|---|---|---|
| 1 | 5/1, 5/2/2, 5/3, 5/4, 5/8, 6/3, 6/5 | 10840 |

The competent authority i.e. Associate Planner (NAINA) CIDCO has given permission to us to construct/erect various buildings on the said property vide their letter dated 13/07/2021 bearing no. CIDCO/NAINA/Panvel/Nandgaon/BP-00526/CC/2021/0093. Town Planning Authority has issued Commencement Certificate vide his letter dated 13/07/2021 bearing no. CIDCO/NAINA/Panvel/Nandgaon/BP-00526/CC/2021/0093. We therefor in view make it to be known to the public at large hereby publish the relevant information relating our said project, Which is as follows.

| | |
|---|---|
| Name and Address of the Owner/Developers | Today Global Realtors Office at 1st floor, Ravriya City, Plot 8A, Sector 18,New Panvel, Navi Mumbai-400206 |
| Name and Address of the Contractor | |
| Order number and date of grant of development permission | CIDCO/NAINA/Panvel/Nandgaon/BP-00526/CC/2021/0093 dated 13/07/2021 |
| Order number and date of Commencement Certificate | CIDCO/NAINA/Panvel/Nandgaon/BP-00526/CC/2021/0093 dated 13/07/2021 |
| Permitted Floor Space Index | Permissible F. S. I. -1.0 |
| Number of premises and their total area permitted | In all 257 residential units (EWS + Free sale), 18 Commercial units in, Total net built up area 12733.942 Sq.Mtr. |
| Address of the space where copies of detailed approved plans & other relevant documents shall be available for inspection. | Today Global Group 1601&1602, Kesar Solitare, plot no. 5, Sector 19, Sanpada, Navi Mumbai -400705 |
| Name of Architect | M/s. Ar. Piyush Tak |
| Name of structure Engineer | SACPL |

**Sd/-**
**For Today Global Realtors Partners**



अर्जदाराचे वकील : सौ.गायत्री घनःश्याम परांजपे

**जाहीर नोटीस**

कर्जत येथील मा.प्रधान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दिवाणी संकीर्ण / चौकशी अर्ज १६/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२४/३/२०२२

सुषमा सुरेश जोशी — अर्जदार
विरुद्ध
अभय अनंत कुलकर्णी — सामनेवाले

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

१) सदरील अर्जदार आणि सामनेवाले हे सख्खे बहिण भाऊ आहेत.

२) अर्जदार आणि सामनेवाले यांची सख्खी आई श्रीमती.स्नेहलता अनंत कुलकर्णी या २९ मे २०१७ रोजी मु.आत्माराम नगर, नागडोंगरी, चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथे निधन पावलेल्या आहेत.

३) अर्जदार आणि सामनेवाले यांची सख्खी वडील श्री.अनंत शिवराम कुलकर्णी हे दि.१३ नोव्हेंबर २०१८ रोजी मु.आत्माराम नगर, नागडोंगरी, चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथे निधन पावलेले आहेत.

४) कै.स्नेहलता अनंत कुलकर्णी आणि कै.अनंत शिवराम कुलकर्णी बँक खात्यामधील मुदत ठेवींस सदरील अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. असे घोषित करून मिळणेसाठी तसेच सदरील बँक खात्यातील रक्कम मिळणेकरिता सदरील अर्जदार या मा.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तसे भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये वारस दाखल्यासाठी अर्ज या मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. सबब, अर्जदार यांचे वारस हक्कास जर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ती हरकत आमचेकडे लेखी पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेवून योग्य वाटल्यास अर्जदार यांस वारस दाखला देईल. मागाहून कोणाचीही हरकत आल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

आज दि.१९ जानेवारी २०२२ रोजी आमच्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, कर्जत** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, कर्जत**


# २३ जानेवारीला कळंबोलीमध्ये दाखल होणार हिंदुहृदसम्राट ज्योत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त मुंबईसह राज्यभरात ठिकठिकाणी सामाजिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. महाआरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर यांसारख्या सामाजिक उपक्रमांचे आयोजन शिवसैनिकांकडून करण्यात आलं आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्ष प्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे, रायगड जिल्हा प्रमुख शिरीष घरत, रायगड जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर, शिरीष बुटाला, बबनदादा पाटील, शिवसेना रायगड़ जिल्हा प्रमुख शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली वंदनीय शिवसेना प्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्ताने रविवार दिनांक २३ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ९:०० वाजता शिवतीर्थ येथे हिंदूहृदयसम्राट ज्योत मुंबई महानगरपालिका महापौर सौ. किशोरीताई पेडणेकर व जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या हस्ते प्रज्वलित करून कळंबोली येथे आणण्यात येणार असल्याची माहिती नुकत्याच शिवसेनेच्या रायगड जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात पार पडलेल्या सभेत देण्यात आली.

सदर ज्योत मुंबई शिवाजी पार्क येथून रायगड उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, रायगड उपजिल्हा संघटक परेश पाटील, पनवेल तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, पनवेल तालुका संघटक भरत पाटील, पनवेल विधानसभा संघटक दिपक निकम, पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे, पनवेल तालुका प्रमुख एकनाथ म्हात्रे, ज्ञानेश्वर बडे, प्रथमेश सोमण, कैलाश पाटील, रुपेश पाटील, दिपक घरत, गुरुनाथ पाटील, प्रभाकर गोवारी, राकेश गोवारी, डि.एन.मिश्रा, सदानंद शिर्के, प्रविण जाधव, यतिन देशमुख, प्रकाश गायकवाड, प्रदीप केणी, जय विजय कुष्ठे, गणेश म्हात्रे. विलास पवार, संदिप पाटील, कैलाश म्हात्रे, प्रदिप केणी, कृष्णकांत कदम,अवचित राऊत, महेश भोईर, सूर्यकांत म्हसकर, गिरीश धुमाळ, ज्ञानेश्वर भंडारी, संदीप तांडेल, प्रकाश म्हात्रे यांच्या उपस्थितीत कळंबोलीत आणण्यात येणार आहे.

२३ जानेवारी वंदनीय हिंदूहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जयंती असल्यामुळे पनवेलमध्ये हिंदूहृदसम्राट ज्योत घेवून येण्यासाठी पनवेल तालुका समन्वयक प्रदिप ठाकूर – ८६५२८४०००७ आणि पनवेल उपमहानगर संघटक सुनित पाटील – ९९२०३०६०८९ यांच्यासह गोविंद जोशी, राजेश केणी, सचिन मोरे (शिवमाथाडी कामगार सेना रायगड जिल्हा प्रमुख),संजय शेंडगे (विभाग प्रमुख कळंबोली), विवेक गडकरी (विभाग संघटक कळंबोली), प्रविण जाधव (शहर संघटक,पनवेल), भरत शिंदे, निनाद दामले, जमिल खान, टिया अरोरा, मनिषा भोसले, सुलक्षणा जगदाळे, संतोष शहाणी, शिवाजी जाधव, अंकुर पाटील, प्रतिक पाटील, अनंता सांगडेकर, मंगेश खांडगे, कामेश थोरात, कपिल जमदाडे, नरेश ढाले, कुंदन पाटील, दिनेश म्हात्रे, अक्षय पाटील, जयेंद्र पाटील, प्रमोद म्हात्रे, चंद्रकांत दुधाळ, सचिन म्हात्रे, रोहन पाटील, भगवान पाटील, रतन पाटील, महेन्द्र पाटील, दिपक पाटील, मिथुन मढवी आदींची उपस्थिती लाभणार असून कार्यक्रमासाठी शिवसैनिकांसह शिवसेना प्रेमींनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




अधिवक्ता निलेश दामु मुंढे

**जाहीर नोटीस**

कर्जत येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात
चौकशी अर्ज क्र.१५/२०२२

मंगळा जैतु माळी (माहेरचे नाव)
सौ.सुलोचना मारुती रुठे (सासरचे नाव)
वय : ५३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.मु.पो.बीड बुद्रुक, ता.कर्जत, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.जन्म मृत्यू निबंधक तथा
ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत दामत–भडवळ,
रा.दामत, ता.कर्जत, जि.रायगड — सामनेवाले

ज्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दि.०१ जानेवारी १९६८ रोजी भडवळ, ता.कर्जत, जि.रायगड येथे जन्म झाला असून निर्धारित कालावधीत त्यांच्या जन्माची नोंद संबंधित दप्तरी न केल्यामुळे तसा जन्माचा दाखला संबंधित मा.जन्म मृत्यू निबंधक तथाग्रामविकास अधिकारी ग्रामपचांयत दामत–भडवळ यांच्याकडून प्राप्त झाला नाही. त्याकामी अर्जदार यांनी मा.न्यायालयात जन्म मृत्यू अधिनियम अन्वये जन्माची नोंद ग्रामपंचायत दामत–भडवळ यांचे दप्तरी होवून तसा दाखला मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. सबब, सदरहू नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, वरील प्रमाणे केलेल्या अर्जासंबंधी कोणाचे काही हितसंबंध हरकत इत्यादी असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत पुराव्यासहीत मा.न्यायालयाच्या निर्दर्शनास आणून द्यावे. मुदतीत कोणाचीही हरकत दाखल झाली नसल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे संबंधित अर्ज निकाली काढून तसा आदेश अर्जदारांच्या लाभांत करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकत विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. ही नोटीस आज दि.१९/१/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्याया, कर्जत** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्याया, कर्जत**



अधिवक्ता निलेश दामु मुंढे

**जाहीर नोटीस**

कर्जत येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात
चौकशी अर्ज क्र.१७/२०२२

बुधी जैतु माळी (माहेरचे नाव)
सौ.कविता काळुराम जामघरे (सासरचे नाव)
वय : ५० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.मु.पो.भडवळ, ता.कर्जत, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.जन्म मृत्यू निबंधक तथा
ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत दामत–भडवळ,
रा.दामत, ता.कर्जत, जि.रायगड — सामनेवाले

ज्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दि.२५ मे १९७१ रोजी मुक्काम भडवळ, ता.कर्जत, जि.रायगड येथे जन्म झाला असून निर्धारित कालावधीत त्यांच्या जन्माची नोंद संबंधित दप्तरी न केल्यामुळे तसा जन्माचा दाखला संबंधित मा.जन्म मृत्यू निबंधक तथाग्रामविकास अधिकारी ग्रामपचांयत दामत–भडवळ यांच्याकडून प्राप्त झाला नाही. त्याकामी अर्जदार यांनी मा.न्यायालयात जन्म मृत्यू अधिनियम अन्वये जन्माची नोंद ग्रामपंचायत दामत–भडवळ यांचे दप्तरी होवून तसा दाखला मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. सबब, सदरहू नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, वरील प्रमाणे केलेल्या अर्जासंबंधी कोणाचे काही हितसंबंध हरकत इत्यादी असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत पुराव्यासहीत मा.न्यायालयाच्या निर्दर्शनास आणून द्यावे. मुदतीत कोणाचीही हरकत दाखल झाली नसल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे संबंधित अर्ज निकाली काढून तसा आदेश अर्जदारांच्या लाभांत करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकत विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. ही नोटीस आज दि.१७/१/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्याया, कर्जत** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्याया, कर्जत**



मुजावर सो

अर्जदारांतर्फे वकील : ॲड.प्रशांत भुजबळ

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२/३/२०२२

१) श्रीमती.रंजना कैलास पाटील
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.पुजा कैलास तांडेल
वय : १३ वर्षे, धंदा : शिक्षण
३) कु.ज्योती कैलास उर्फ कैलाश तांडेल
वय : १० वर्षे, धंदा : शिक्षण
नं.२ व ३ तर्फे अज्ञान पालनकर्ती
आई अर्जदार नं.१
४) श्रीमती.तुळशी मोरेश्वर तांडेल
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.घर नं.१४३, बुद्धवाडी, करंजाडे,
पो.वडघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.कैलाश उर्फ कैलास मोरेश्वर तांडेल यांचे निधन दि.२५/१२/२०२० रोजी झालेले आहे. श्रीमती.रंजना कैलास तांडेल वगैरे ह्यांनी कै.कैलाश उर्फ कैलास मोरेश्वर तांडेल यांच्या सामाईक मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतींचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

| गावाचे नाव | यु.केस नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| पारगांव डुंगी | १३२ | ३४ | १२ | ०–०४–६ |
| | | ३४ | २० | ०–०६–९ |
| | | ३५ | ३ | ०–२४–५ |
| पारगांव | ९० | २५ | ४ | ०–३७–० |
| | | २६ | १ | ०–३७–० |
| | | २७ | २ | ०–७३–८ |

वरील संपादीत मिळकतीपोटी २२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.कैलाश उर्फ कैलास मोरेश्वर तांडेल यांना सामाईकात मौजे : ''पुष्पकनगर'' दापोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड नं.१५, सेक्टर नं.६, क्षेत्र २९०० चौ.मी. हा भूखंड दि.०३/०६/२०१५ रोजीच्या वाटप पत्राद्वारे वितरित करण्यात आलेला आहे.

श्रीमती.रंजना कैलास तांडेल वगैरे हे कै.कैलाश उर्फ कैलास मोरेश्वर तांडेल यांचे कायदेशीर वारस आहेत, ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्रीमती.रंजना कैलास तांडेल वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.कैलाश उर्फ कैलास मोरेश्वर तांडेल यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२०/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


**पृष्ठ क्र.१ वरुन...**

## रस्त्यावर सम–विषम पार्कींग

वाहनांना अडथळा होण्याची शक्यता असल्याने न्यायालयाच्या रोडची लांबी आणि रुंदीचा विचार करता सदर रोडवर नो–पार्कींग करण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे वाहतूक विभागाकडून जिल्हा सत्र न्यायालय लोखंडी पाडा आणि अशोकबाग आणि पनवेल तालुका पोलीस स्टेशनकडे जाणारया रस्त्यावर सम–विषम पार्कीगची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. सदरची अधिसूचना १८ जानेवारी २०२२ रोजी पासून पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहणार असल्याचे वाहतूक विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## गर्भवतीचा प्रसुती उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू

गुन्हा आहे, बालविवाहाची शिकार झालेले अनेक निष्पाप मुलींना आपले प्राण गमवावे लागत आहे, वधू व वर यांच्या पालकांनी आपल्या मुलांच्या भवितव्याच्या दृष्टीने कोणतेही बालविवाह सारखे गुह्याचे पाऊल उचलू नये, यामध्ये आपले अनमोल जीव गमावले जातात. यासाठी समाजात प्रबोधन व जनजागृती करण्यावर भर दिल्यास अल्पवयीन विवाह पद्धतीला आळा बसेल, व बालकांचे लैगिक शोषण होण्यापासून रोखले जाईल असे आवाहन पाली पोलिसांनी केले.

## तळा नगरपंचायत निकाल ; दयानंद जानराव यांचा पराभव शिवसेनेच्या जिव्हारी

एका मताने झालेला पराभव शिवसेनेला जिव्हारी लागला असला तरी पराभवाने खचून न जाता जनतेच्या हिताची कामे आणि पक्ष संघटना मजबूत करण्याचे काम जोमाने केले जाईल असे मत शिवसैनिकांमध्ये व्यक्त केले जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांची ग्राहकां बरोबर दादागिरी ; सूचना न देताच हॉस्पिटलचा वीज पुरवठा खंडित

**दै.रायगड नगरी । पेण**

वीज महामंडळाच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची वीज बिल वसुलीच्या निमित्ताने ग्राहकांवर दादागिरी सुरु असल्याचे चित्र सध्या पेण तालुक्यात दिसून येत आहे. जोहे येथील डॉ.शेखर धुमाळ यांना देखील वीज महामंडळाच्या या दादागिरीचा फटका बसला असून कोणतीही पूर्व सूचना न देता तसेच लाईटबील देयक भरले असताना सुध्दा त्यांच्या हॉस्पिटलची लाईट कट करुन नाहक मनस्ताप देण्यात आला आहे. यावेळी हॉस्पिटलमध्ये रुग्ण उपचार घेत असल्याचेही त्यांनी सांगितले. वीज मंडळाच्या या बेकायदेशीर कारवाई विरोधात डॉ.शेखर धुमाळ हे न्यायालयात दाद मागणार आहेत.



वीज बील वसुलीच्या नावे पेण येथील वीज महामंडळ कर्मचाऱ्यांनी सध्या ग्राहकांना त्रास देण्याचे धोरण अवलंबिले आहे. एकीकडे वीज थकबाकी असणाऱ्या बड्या कंपन्या, वीज चोरी करणारी बडी धेंड यांना सोडून या कर्मचाऱ्यांनी सर्वसामान्य ग्राहकांना त्रास देण्याचे धोरण अवलंबिले आहे. वीज मीटरची रिडींग वेळेत घेणे, वीज बील देयके ग्राहकांना वेळेत पोहचवणे यासाठी महामंडळाने खाजगी संस्थाची नेमणूक केलेली आहे. या खाजगी संस्थाकडून ही कामे वेळेत होत नाहीत. यामुळे अनेक वेळा वीज बिलवरील देयकाची अंतिम तारीख उलटून गेल्यावर ग्राहकांना बील मिळते. मात्र त्यांनी केलेल्या चुकीची शिक्षा ही ग्राहकांना दिली जात आहे. एकीकडे अनेक खाजगी कंपन्यांची लाखो करोडो रुपयांची वीज बिल थकबाकी असताना त्यांच्या वर कोणतीही कारवाई न करता सर्वसामान्य ग्राहकांची एक महिन्याची थकबाकी असताना कोणतीही पूर्व सूचना न देता महामंडळाचे कर्मचारी मीटर मधून वीज कनेक्शन कापणे, पोल वरून वीज कनेक्शन कापणे, मीटर काढून नेणे अशा कारवाया करत करुन ग्राहकांना वेठीस धरण्याचे काम करत आहेत.

जोहे येथील डॉ.शेखर धुमाळ यांनी सुतीका गृह व ऍक्युपंक्चर सेंटर साठी २०१९ मध्ये नवीन व्यावसायिक वीजमीटर घेतला आहे. या वीज मीटरचे कोणत्याही महिन्याचे विजबील थकीत नसताना पेण वीज महामंडळाचे अभियंता उमाकांत सपकाळे व नाईक यांनी गुरुवारी ( ता.१९) दुपारी आपल्या पथकासह डॉ.शेखर धुमाळ यांच्या जोहे येथील क्लिनिकचा विद्युत पुरवठा कोणतीही पूर्व सूचना न देता खंडीत केला. विशेष म्हणजे यावेळी या क्लिनिक मध्ये पेशंट उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. वीज महामंडळाच्या बेकायदेशीर कारवाई विरोधात डॉक्टर शेखर धुमाळ न्यायालयात दाद मागणार आहेत.

# कर्जत येथे नागरी संरक्षण आपत्ती व्यवस्थापन मुलभूत प्रशिक्षण वर्गांचे आयोजन

## नगरसेवक बळवंत घुमरे, माजी नगरससेविका बिनिता घुमरे, क्रिडा शिक्षक आणि आर.एस.पी. अधिकारी स्वप्निल नामदास यांचा पुढाकार

**दै.रायगड नगरी । खोपोली**

आपत्ती काळात स्थानिक पातळीवर सैनिक, स्वयंसेवक निर्माण होण्याच्या उद्देशाने कर्जत येथील नगरसेवक बळवंत नरहरी घुमरे, माजी नगरससेविका बिनिता बळवंत घुमरे, क्रिडा शिक्षक आणि आर. एस.पी. अधिकारी स्वप्निल वसंत नामदास यांच्या वतीने नागरी संरक्षण आपत्ती व्यवस्थापन मुलभूत प्रशिक्षण पाच दिवसीय वर्गांचे आयोजन करण्यात आले आहे.



कर्जत येथील सरकारी दवाखान्याजवळील श्री कृपा बिल्डींग २ रा मजला तावडे क्लासेसच्यावर गृह मंत्रालयाच्या मान्यतेने दि. १७ जानेवारी ते २१ जानेवारी दरम्यान, दुपारी २.३० ते ६.३० या वेळेत प्रभारी सहायक उपनियंत्रक का. र. कुरकुटे, ना. सं. दल उरणचे श.भा. शिरसाठ हे उपस्थितांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देत आहेत. कर्जत शहरात प्रथमच होणाऱ्या या शिबीरात २४ जणांनी नावनोंदणी केली आहे. नागरी संरक्षण दलात सहभागी व्हा आणि देशसेवा करा, हे ब्रिदवाक्य घेवून होणाऱ्या या शिबीरात आधुनिक युद्ध तंत्र व देशाचे संरक्षण, नागरी संरक्षण का? कसे? व केव्हा? नागरी संरक्षण संघटना व सेवा, हवाई हल्ला इशारा व प्रणाली, नियंत्रण केंद्र / उप नियंत्रण केंद्र कामकाज व कार्यप्रणाली, प्रकाशबंदीचे नियम, आगीचे तत्व, गृह अग्निशमन पथक संघटन व कार्य, रिकीब पंप रचना व कार्य, तीव्र स्फोटक बॉम्ब प्रकार व संरचनात्मक उपाययोजना, रासायनिक अग्निशामक, विमोचन सेवा संघटना साहित्य, आप्तकालिन जखमींना वाहून नेण्याच्या पध्दती, दोरांचे प्रकार व गाठी, प्रथमोपचार तत्वे व प्रथमोपचार साहित्य, जखम रक्तस्राव व उपचार, त्रिकोणी बँडेज, श्वासावरोध व कृत्रिम श्वसन पध्दती, रुग्णशिबिका कवायत, रूग्णशिबिका कवायत सराव, नियंत्रण केंद्र / उप नियंत्रण केंद्र यांची कार्यपध्दती आदींबाबत प्रशिक्षण दिले जात आहे. थेअरीसोबतच प्रक्टीकल देखील या शिबिरात देण्यात येणार आहे.


सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(भूखंड वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **वाटपपत्र/करारनामा** करणे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | हिस्सा क्र./ सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | वाटप/करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | वाटप/करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | |
| १ | उलवे<br>१३५ | तरघर<br>९८ | ४/५<br>८९/३ | ०-०९-६<br>०-८६-० | एकूण मंजूर पात्रता ८५० चौ.मी. पैकी ४०० **चौ.मी.** प्रस्तावित | **भूखंड क्र.१९० C, सेक्टर-२३, क्षेत्र ४०० चौ.मी.** | १) श्री. महादेव कमलाकर ऊर्फ कमळया भगत ऊर्फ कामोठकर<br>२) श्री. यशवंत कमलाकर ऊर्फ कमळया भगत ऊर्फ कामोठकर<br>३) श्री. अशोक कमलाकर ऊर्फ कमळया भगत<br>४) श्रीमती ताराबाई मोरेश्वर भोईर<br>५) श्री. लक्ष्मण केशव भगत ऊर्फ कामोठकर<br>६) श्रीमती मंदा भगवान पाटील | |
| | | | **एकूण** | **०-९५-६** | | | | |
| २ | तळोजा<br>९९३ | पेंधर<br>१७९ | १३५/३ | ०-१९-७ | **१५० चौ.मी.** | **भूखंड क्र. १०८+१०९, सेक्टर-२, क्षेत्र १५० चौ.मी.** | श्री. मधुकर बाल्या पाटील | रे.मु.नं. ३९/२००६ अन्वये १/३ हिस्से नुसार |
| | | | **एकूण** | **०-१९-७** | | | | |
| ३ | तळोजा<br>५५८ | पेंधर<br>४ | ४५/०<br>५०/०<br>५१/०<br>५२/०<br>१५४/२<br>१८२/० | ०-१५-०<br>०-५३-६<br>०-५७-८<br>२-०४-९<br>०-२१-५<br>०-३४-० | **४०० चौ.मी.** | **भूखंड क्र. ५८, सेक्टर-२६, क्षेत्र ४०० चौ.मी.** | **श्री. मनसुन अब्दुल लतिफ पटेल व इतर यांचे वारसांपैकी हिस्सेवाटणीनुसार**<br>**कै. मोहसिन अ. लतिफ पटेल (मयत) यांचे वारस**<br>१) सफिया मो. मोहसिन पटेल<br>२) अब्दुल अजिज मो. मोहसिन पटेल<br>**३) कै. मोहमद जाहिद मो. मोहसिन पटेल (मयत) यांचे वारस**<br>३.१) शबाना मो. जहिद पटेल<br>३.२) यार्सीया मो. जहिद पटेल<br>३.३) बरीराह मो. जहिद पटेल<br>३.४) नमिरा मो. जहिद पटेल<br>३.५) मसिरा मो. जहिद पटेल<br>३.६) हुमेरा मो. जहिद पटेल<br>३.७) उस्मान मो. जहिद पटेल<br>४) अब्दुल लतिफ मो. मोहसिन पटेल<br>५) साजिदा दस्तगिर पटेल<br>६) नाहीदा इम्रान पटेल<br>७) माजिदा रफिउद्दीन पटेल<br>८) सउदा वलीउल्लाह पटेल | निरंक |
| ४ | तळोजा<br>५५८ | पेंधर<br>४ | ४५/०<br>५०/०<br>५१/०<br>५२/०<br>१५४/२<br>१८२/० | ०-१५-०<br>०-५३-६<br>०-५७-८<br>२-०४-९<br>०-२१-५<br>०-३४-० | **४०० चौ.मी.** | **भूखंड क्र. ९२, सेक्टर-२३, क्षेत्र ४०० चौ.मी.** | **श्री. मनसुन अब्दुल लतिफ पटेल व इतर यांचे वारसांपैकी हिस्सेवाटणीनुसार**<br>**कै. अब्दुल्ला अब्दुल लतिफ पटेल (मयत) यांचे वारस**<br>१) शेहनाज अब्दुल्ला पटेल<br>२) सोएब अब्दुल्ला पटेल<br>३) सौबान अब्दुल्ला पटेल<br>४) सुफियान अब्दुल्ला पटेल<br>५) सुमिय्या जमिर पटेल | निरंक |
| ५ | तळोजा<br>५५८ | पेंधर<br>४ | ४५/०<br>५०/०<br>५१/०<br>५२/०<br>१५४/२<br>१८२/० | ०-१५-०<br>०-५३-६<br>०-५७-८<br>२-०४-९<br>०-२१-५<br>०-३४-० | **४०० चौ.मी.** | **भूखंड क्र. ९२+९३+११०+१११, सेक्टर-२, क्षेत्र ४०० चौ.मी.** | श्री. मनसुन अब्दुल लतिफ पटेल व इतर यांचे वारसांपैकी हिस्सेवाटणीनुसार<br>श्री. अब्दुल कादिर अ. लतिफ पटेल | निरंक |
| ६ | उलवे<br>१८८३ | गव्हाण<br>३३९ | ४२/३ | ०-१६-६ | **१५० चौ.मी.** प्रस्तावित | **भूखंड क्र. ३३४, सेक्टर-१७, क्षेत्र -१५० चौ.मी.** | **कै. रामा धर्मा कोळी (मयत)**<br>**कै. बारसुबाई रामा कोळी(मयत)**<br>**कै. जोमा काशिनाथ कोळी (मयत)**<br>**कै. गणूबाई जोमा कोळी (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. गजानन जोमा कोळी,<br>२) श्री. अनिल जोमा कोळी | |
| | | | **एकूण** | **०-१६-६** | | | | |
| | | | | **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | |
| ७ | उलवे<br>३७६ | वहाळ<br>८० | १९५/०<br>२०६/१<br>१३२/१<br>१९२/३ | ०-८६-०<br>०-१६-०<br>०-०२-०<br>०-०३-०<br>०-११-९<br>०-०३-० | **१८०० चौ.मी.** | **भूखंड क्र. ७८, सेक्टर-२१, क्षेत्र-१३५० चौ.मी.** | **मूळ भूधारक-काशिनाथ सिताराम नाईक (मयत) यांचे वारस**<br>**१. कै. अमृत काशिनाथ नाईक (मयत) यांचे वारस**<br>१.१) द्रोपदी अमृत नाईक<br>**१.२) कै. अरविंद अमृत नाईक- मयत यांचे वारस**<br>१.२.१) संगीता अरविंद नाईक<br>१.२.२) श्री. सोहम अरविंद नाईक<br>१.२.३) सोनिया अरविंद नाईक<br>१.२.४) स्मिता अरविंद नाईक<br>१.३) श्री. भूपेंद्र अमृत नाईक<br>१.४) श्री. अश्विन अमृत नाईक<br>१.५) श्री. समाधान अमृत नाईक<br>**२) कै. भरत काशिनाथ नाईक (मयत) यांचे वारस**<br>२.१) तूलसा भरत नाईक<br>२.२) श्री. रोशन भरत नाईक<br>२.३) श्री. प्रशांत भरत नाईक<br>२.४) श्री. रत्नदिप भरत नाईक<br>२.५) सुगंधा पद्माकर पाटील<br>**३) कै. रामलाल काशिनाथ नाईक (मयत) व सूनंदा रामलाल नाईक (मयत) (पत्नी) यांचे वारस**<br>३.१) श्री. जिवन रामलाल नाईक<br>३.२) श्री. श्रीधर रामलाल नाईक<br>३.३) कुमारी सरीता रामलाल नाईक<br>४. सौ. रूक्मिनी अंकूश नाईक<br>५. श्री. घनश्याम अंकूश नाईक<br>६. कुमारी प्रमिला अंकूश नाईक<br>७. श्री. साईनाथ अंकूश नाईक<br>८. सौ. निर्मला राम ठाकूर<br>९. सौ. यमूना अण्णा पाटील | निरंक |
| ८ | | वहाळ<br>७२ | १६१/० | ०-८२-५ | | **भूखंड क्र. ६७D, सेक्टर-१९, क्षेत्र-४५० चौ.मी.** | | |
| ९ | तळोजा<br>२५९ | तळोजा<br>१४९+<br>१५०<br>अ/४० | १८६/३ | ०-७९-५ | **७०० चौ.मी. पैकी १०० चौ.मी.** | **भुखंड क्र.२७, सेक्टर-१७, क्षेत्र ९९.४२ चौ.मी.** | मुळ भूधारक<br>श्री. महादु सुदाम घरत | निरंक |
| | | | | **ता. उरण, जि. रायगड** | | | | |
| १० | नवघर/<br>६४९ | ४०९/<br>८५-८६ | २५/९<br>४७/७अ<br>५३/१६<br>५३/१९<br>५९/६<br>११८/८<br>१२१/१६<br>१०६/४अ<br>१८२/२अ<br>१८३/११<br>१८५/३अ<br>१८७/८<br>१९२/१२<br>१९८/१<br>२०४/१<br>२०४/१०<br>१८९/५<br>२१८/७<br>२२४/४<br>२२३/९<br>२२८/११<br>२३७/८<br>२७२/७<br>२७९/१२<br>२८३/४<br>२८७/८ | २-४१-० | **२१०० चौ.मी. हिस्से वाटणीनुसार ५०० चौ.मी** | **द्रोणागिरी येथील सेक्टर क्र. ५६, भूखंड क्र. ११, क्षेत्र-५०० चौ.मी.** या इरादित भूखंडाची वाटपाची पुढील प्रक्रिया सुरु आहे. | १) मुळ भूधारक - श्री. यशवंत कृष्णा तांडेल | निरंक |
| | | | **एकूण** | २-४१-० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संपादित जमिनीबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहेत. तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करुन करारनामा/वाटपपत्र करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र.१०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
सिडको/जनसंपर्क/३९३/२०२१-२२

# संक्षिप्त...

## मराठी पाट्यांच्या राज्यशासनेच्या निर्णयानंतर नवीन पनवेल मनसेचे अनिकेत मोहिते आक्रमक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्रातील दुकानावर ठळक आणि मोठ्या अक्षरात मराठी पाट्या लावण्याच्या राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतर नवीन पनवेलमध्ये महाराष्ट्र सैनिक आक्रमक झाले. आहेत. नवीन पनवेल, खांदा कॉलनी येथील विभागामध्ये गुरुवारी महाराष्ट्र सैनिकांकडून दुकानदारांना स्मरणपत्रे वाटण्यात आले. महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे नवीन पनवेल शहराध्यक्ष अनिकेत मोहिते यांच्या नेतृत्वाखाली लेखी निवेदन देण्यात आले.

प्रत्येक दुकानांवर मराठी पाट्या लावल्याच पाहिजेत. जिथे जिथे दुकानांच्या इंग्रजी पाट्या असतील त्या दुकानदारांना पंधरा दिवसाचा कालावधी देत लवकरात लवकर दुकानाच्या पाट्या या मराठी भाषेमध्ये कराव्यात. नवीन पनवेल, खांदा कॉलनी या शहरांमध्ये असाच उपक्रम मनसे राबवणार असं मराठीच्या मुद्यावरून मनसे रस्त्यावर उतरलेली आहे. मराठी पाटी लावण्याच्या निर्णयाला विरोध करून पाहणार्या व्यापारांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून खळखट्याकचा इशारा देण्यात आला आहे. त्याप्रसंगी सुजित सोनवणे, सचिन जाधव, मंदार गोसावी, विशाल दहातोंडे, शार्दूल थोपटे, प्रतिक भालेराव, सौरभ पाटोळे, किरण गावडे, आयुष घार्गे, आदि उपस्थित होते.



## रोटरी क्लब ऑफ उलवे नोड यांच्या माध्यमातून गरजू कुटुंबांना ई-रिक्षा प्रदान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रोटरी क्लब ऑफ उलवे नोड यांच्यावतीने साई देवस्थान साई नगर वहाळ येथे भारतात प्रथम पॅसेंजर इलेक्ट्रॉनिक ई रिक्षाचे एका गरजू कुटुंबाला वाटप करण्यात आले.

यावेळी रोटरी ३१३१ चे डी. जि पंकज शहा, रोटरीचे डॉक्टर गुणे, एन आर आय पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील, साई देवस्थानचे रवींद्र पाटील, पर्यावरण डायरेक्टर जयदीप मालविया, असिस्टंट गव्हर्नर सागर गुंडेवार, असिस्टंट गव्हर्नर सुनील कुरूप आदी उपस्थित होते.

### शिवडी- चिर्ले ब्रीजला हुतात्मा नामदेव घरत यांचे नांव देईपर्यंत...

# लॉजिस्टीक पार्क व अलिबाग-विरार कॉरीडॉरला जमीन देण्यास विरोधच

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चिर्ले ग्रामपंचायत हद्दीत एम एम आर डी एचा शिवडी – न्हावाशेवा – चिर्ले ब्रीज, मुंबई ट्रान्सहर्बर लिंक (चढ्ढ) हा प्रकल्प पूर्णत्वास येत आहे.२०२२ अखेर पर्यंत या ब्रीजचे लोकार्पण होऊ शकते असे समजते. त्या पार्श्वभूमीवर सदर ब्रीज चिर्ले गावाच्या हद्दीत असल्याने दिवंगत लोकनेते दि.बा पाटील यांच्या नेतृत्वाखालील १९८४ च्या शेतकरी लढ्यात ज्या हुतात्म्यांनी आपले प्राण पणाला लावले त्या चिर्ले गावातील सुपुत्र हुतात्मा नामदेव शंकर घरत यांचेच नाव देण्यात यावे असा ठराव चिरले ग्रुपग्रामपंचायतीच्या ८ ऑक्टोबर २०२१ च्या ग्रामसभेत सामाजिक कार्यकर्ते संदेश ठाकूर यांनी मांडला व सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला.



सदर ठरावाचा पाठपुरावा १६ जानेवारी हुतात्मा दिनाचे औचित्य साधून चिर्ले ग्रामस्थ व प्रकल्पग्रस्तांनी चिरले येथील हुतात्मा नामदेव घरत यांच्या पुतळ्यासमोरच केला. उरण-पनवेल तालुक्यातील सर्वपक्षीय प्रमुख नेतेमंडळी व दिवंगत लोकनेते दि.बा.पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील यांना निवेदन आणि ठरावाची प्रत दिली व शिवडी – चिर्ले या ब्रीजला हुतात्मा नामदेव घरत यांचेच नाव देण्यात यावे असे आवाहन करण्यात आले.

जोपर्यंत नाव दिले जात नाही व हुतात्म्यांचा योग्य सन्मान केला जात नाही तोपर्यंत चिर्ले हद्दीत येणाऱ्या अलिबाग–विरार कॉरीडॉर व लॉजिस्टीक पार्क या प्रकल्पांना प्रखर विरोध करून भूसंपादनास संमती देणार नाही अशी शपथच चिरले ग्रामस्थांनी घेतली. याप्रसंगी गावातील राजकिय मतभेद विसरून मोठ्या संखेने ग्रामस्थ उपस्थित होते.

> ज्या हुतात्म्यांनी जमीन बचाव आंदोलनात आपले प्राण दिले त्यांचा सन्मान झालाच पाहिजे. चिर्ले भूमितील प्रकल्पाला चिरले गावचेच हुतात्मा नामदेव घरत यांचेच नाव दिले पाहिजे ही मागणी योग्यच आहे आणि हाच खऱ्या अर्थाने हुतात्मांचा सन्मान होईल. त्यासाठी आम्ही लढतच राहणार. जनतेला पण कळेल पुढाऱ्यांचा हुतात्म्यांवर किती प्रेम आहे कि फक्त ढोंगीपणा आहे
>
> **संदेश ठाकूर, चिर्ले - उरण**

# अन्यायकारी कारवाई केल्यास आंदोलन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

काळुंद्रे ओएनजीसी येथील रेल्वे हद्दीलगतच्या घरांचे जोपर्यंत सर्वेक्षण व त्यांच्या पुनर्वसनाचा योग्य निर्णय होत नाही तोपर्यंत पुढील कुठलीही कार्यवाही करू नये, अशी मागणी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर तसेच भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे यांनी रेल्वेकडे केली आहे. तसेच अन्यायकारी कारवाई केल्यास आंदोलनाचा ईशाराही त्यांनी प्रश्नासनाला दिला आहे.



या संदर्भात रेल्वेचे पनवेल विभागीय अभियंता संदीप सिन्हा यांची जयंत पगडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने आज (दि. २०) भेट घेतली व त्यांना निवेदन सादर करून चर्चाही करण्यात आली. या शिष्टमंडळात प्रभाग समिती सभापती वृषाली वाघमारे, नगरसेविका चारुशीला घरत, नगरसेवक तेजस कांडपिळे, अजय बहिरा, भाजपचे शहर सरचिटणीस अमरीश मोकल, शंकर म्हात्रे, चंद्रकांत मंजुळे, अशोक आंबेकर, आणि रहिवासी यांचा समावेश होता.

रेल्वेला देण्यात आलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, काळुंद्रे ओएनजीसी येथील रेल्वे हद्दीलगतच्या घरांना रेल्वेने अनधिकृत ठरवून सात दिवसांत घरे रिकामी करणेबाबत दि. १५ जानेवारी २०२२ रोजी दिलेली नोटीस ही अत्यंत अन्यायकारक आहे. येथील सर्व रहिवासी हे गेली अनेक वर्षापासून येथे राहत असून त्यांचेकडे काळुंद्रे ग्रामपंचायतीची घरपट्टी, स्थानिक रेशनकार्ड, काळुंद्रे ग्रामपंचायत पाणीपट्टी, मतदान ओळखपत्र, लाईट बिल व इतर रहिवासी पुरावे व अन्य दाखले उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे पनवेल महानगरपालिकेने प्रधानमंत्री आवास योजन अंतर्गत दि.१८ जानेवारी २०१८ च्या सूचनेनुसार प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मुलभूत सोयी रहिवाशांना पुरविण्यासाठी व सुधारणा पुनर्विकास निर्मुलनाची कामे करण्यासाठी नमूद केलेल्या पनवेल महानगरपालिका हद्दीतील वस्त्या, झोपडपट्टी म्हणून अधिकृत अधिसूचित करावयाच्या यादीत देखील एकविरा झोपडपट्टी, भिंगारी येथील घरांचा उल्लेख आहे. तरी देखील आपण या घरांना अनधिकृत ठरवून दिलेली नोटीस चुकीची आहे. पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांचे २०२२ पर्यंत सर्वांना घर देण्याचे उद्दीष्ट आहे व त्यादृष्टीने समाजातील तळागाळातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांसाठी संपूर्ण देशभरात विविध गृहनिर्माण प्रकल्प चालू आहेत. अशा वेळी आपण राहत्या घरांतील लोकांना बेघर करणेबाबत नोटीस देत आहात हे दुर्दैवी आहे. जर रेल्वेला काही कामास्तव या घरांची अडचण होत असेल तर रेल्वेने प्रथम सक्षम प्राधिकरणामार्फत या सर्व घरांचे सर्वेक्षण करावे व त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावावा व नंतरच पुढील कार्यवाही करणे उचित ठरेल. आमचा रेल्वे विकास प्रकल्पांना विरोध नाही, मात्र जोपर्यंत सर्वेक्षण व पुनर्वसनाचा निर्णय होत नाही तोपर्यंत सदर बांधकामे तोडणेबाबत कुठलाही निर्णय घेऊ नये, अन्यथा आम्हांला तीव्र आंदोलन करावे लागेल, असा ईशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे. यावर संदीप सिंह यांनी वरिष्ठांकडे सदरची बाब कळवणार असल्याचे सांगून सुचनासंदर्भात गांभीर्याने सकारात्मक भूमिका घेऊ असे शिष्टमंडळाला आश्वस्थ केले.

## अज्ञात वाहनाच्या धडकेने मोटार सायकलस्वाराचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका अज्ञात वाहनाची धडक मोटार सायकलला बसल्याने त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेल जवळील मुंबई–पुणे जुना हायवे रोडवर वेलवेट हॉटेलच्या समोर कोळखे गावाच्या परिसरात घडली आहे.

मोटार सायकलस्वार अशोककुमार रामलोटन गुप्ता (५१) हे त्यांच्या ताब्यातील मोटार सायकल क्र.एमएच–४३–बीएल–६५७४ हे मुंबई–पुणे जुना हायवे रोडने जात असताना हॉटेल वेलवेटच्या समोर पुणे बाजूकडे त्यांच्या मोटार सायकलला कोणत्या तरी अज्ञात वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात ते गंभीररित्या जखमी होवून त्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# रणधुमाळी : माथेरानमध्ये आरक्षणा शिवाय युत्या आघाड्या अनिश्चित

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील प्रमुख पक्षांत सत्ता स्थापन करण्यासाठी युत्या आणि आघाड्या बाबतीत जरी कमालीची गुप्तता पाळण्यात येत असली तरीसुद्धा मागील काळात एकमेकांचे कट्टर विरोधक असणाऱ्या नेते मंडळींमध्ये खाजगीत बैठका घेतल्या जात असल्याचेही बोलले जात आहे. यावेळेस वीस उमेदवारांना नगरपरिषदेत जाण्याची संधी उपलब्ध होणार आहे त्यामुळे काहींनी अगोदरच आपले वार्ड निश्चित करून केवळ पक्षाच्याच आर्थिक बळावर सभागृहात जाण्याचे दिवास्वप्न उराशी बाळगले आहे. अद्यापही आरक्षण जाहीर झालेले नाही.

त्यामुळे इच्छुक मंडळींनी थोडा धीर धरला आहे त्यातच यावेळेस २०१६ च्या निवडणुकीत ज्यांनी ज्यांनी विजय मिळवला होता. त्यातील क्वचितच तीन ते चार जणांना निवडून येण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे. राज्यातील अनेक दिग्गज लोकप्रतिनिधी पक्षांतर करतात तर त्यास माथेरान मधील काही लोकप्रतिनिधी कसा




काय अपवाद असू शकतात त्यामुळे इथेही काही महिन्यांपूर्वी एका पक्षातून दुसरीकडे उडी मारून स्वतःचे उखळ पांढरे करून घेण्यासाठी रस्सीखेच सुरू होती. २०१६ मध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना मतदार पुन्हा एकदा संधी देतीलच असा विश्वास सध्यातरी मतदारांच्या चर्चेवरून दिसत नाही. काही मोजकी जुनीच राजकीय मंडळी आणि सर्व नवखे चेहेरे यावेळी सभागृहात दिसण्याची शक्यता जरी नाकारता येत नसली तरी आर्थिक दृष्ट्या सक्षम उमेदवारांना आणि जे फक्त पक्षाच्या भरवशावर बाशिंग बांधून सज्ज झाले आहेत. विशेष करून त्यांना सुध्दा वेळप्रसंगी स्वतःच्या इभ्रतीसाठी स्वतःच्या खिशाला चाट द्यावी लागणार आहे. दरवेळेस काहिनाकाही कारणास्तव अथवा कार्यकर्त्यांच्या मर्जीविरुद्ध लोकांना अर्थातच ज्यांचे गावासाठी शून्य योगदान आहे, पार्श्वभूमी आणि वागणूक कार्यकर्त्यांना न पटणारी आहे अशांना पक्षात वाव दिल्यामुळे साहजिकच त्या त्या पक्षातील कार्यकर्त्यांमधून नाराजीचा सूर उमटताना दिसत आहे.

सत्ता स्थापन करण्यासाठी प्रमुख पक्षांनी कंबर कसली असून सत्तेसाठी वाट्टेल त्या थराला जाऊन वेळप्रसंगी मागील काळात जरी एकमेकांना पाण्यात पाहणारी हीच राजकीय मंडळी हातात हात घालून मतदारांसमोर मतांचा जोगवा मागण्याची शक्यता दिसत आहे. ज्यांनी खरोखरच आपल्या कार्यकाळात कामांना न्याय दिला आहे, पाय जमिनीवर आहेत, जनसंपर्क दांडगा आहे, अदबीने वागणे, स्वच्छ पार्श्वभूमी आहे, सुखदुःखात हजेरी लावून आधार देणारा उमेदवार, स्वच्छ प्रतिमा, स्वच्छ चारित्र्य अशांना कदाचित यावेळी सभागृहात जाण्याची संधी मतदार देऊ शकतात परंतु त्यांच्याकडून समाधानकारक मताचा मोबदला घेऊनच अशीच परिस्थिती सध्यातरी मागील काळातील काही लोकप्रतिनिधीच्या बाबतीत सिंहावलोकन केल्यास निर्माण झालेली इथे पहावयास मिळत आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीची विजयश्री खऱ्या अर्थाने आर्थिक देवाणघेवाण वर सुध्दा अवलंबून राहणार असल्याचे बोलले जात आहे.

## शेकाप जासईतर्फे वाहण्यात आली एन.डी.पाटील यांना भावपुर्ण श्रद्धांजली

**दै.रायगड नगरी । उरण**

अखेरच्या श्वासा पर्यंत ज्यांनी एकाच पक्षाशी आपली नाळ जोडून ठेवली असे शेतकरी कामगार पक्षाचे जेष्ठ नेते, विचारवंत प्रा. एन डी पाटील यांचा अकस्मात निधन झाल्याने उरण तालुक्यातील जासई येथील शेतकरी कामगार पक्षातर्फे प्रा. एन डी पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

महाराष्ट्रातील पुरोगामी परिवर्तनवादी चळवळीचे अग्रणी जेष्ठ नेते, माजी सहकार मंत्री वयाच्या ९३ व्या वर्षी काळाने त्यांच्यावर झडप मारली. गोर गरिबांचे कैवारी, शेतकरी कष्टकरी वर्गाबद्दल आस्था असलेले, जनहिताशी शेवटपर्यंत बांधिलकी जपणारे तत्वनिष्ठ व निस्वार्थी नेता सह्याद्रीचा सिंह हरपला. व आपल्या सर्वांना पोरका करून गेला. असा दूर दृष्टीचा नेता पुन्हा होणार नाही. असे मत माजी सभापती नरेश घरत यांनी श्रद्धांजली प्रसंगी मांडले.शेकापचे जेष्ठ नेते गोपीनाथ ठाकूर, सरपंच संतोष घरत, गुरुनाथ घरत, नामदेव ठाकूर, अभिमन्यू ठाकूर, शेकाप जासईचे अध्यक्ष नामदेव पाटील, धीरज घरत, सुभाष घरत, बळीरामशेठ घरत, प्रदीप घरत, दत्तात्रेय घरत, अनंत पाटील आदींनी श्रद्धांजली वाहून आपले विचार व्यक्त केले. कोरोना विषयक शासनाचे सर्व नियम पाळून शेकाप जासई तर्फे प्रा. एन डी पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

## कामगार नेते महेंद्र घरत यांचा महाराष्ट्र वखार महामंडळातील कामगारांकडून जंगी सत्कार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र वखार महामंडळातील कामगारांचा बऱ्याच दिवसांपासून दुसऱ्या पाळीच्या टाईमिंगचा प्रश्न प्रलंबित होता. रात्री १२ वाजता कामावरून सुटत होते. लवकर गेले तर पगार कपात होत होता. या सर्व गोष्टींमुळे कामगारांना मानसिक त्रास होत होता.

कामगारांनी भाजपची तसेच मनसेची युनिअन केली, परंतु कोणीही बदल करू शकला नाही. शेवटी कामगारांनी कामगार नेते महेंद्र घरत यांचे मेजॉरीटीने नेतृत्व स्वीकारले व त्यांना विनंती केली असता कामगार नेते महेंद्र घरत यांनी आपले नेतृत्व कौशल्य वापरून व्यवस्थापनाला कामगारांच्या म्हणण्यानुसार दुसऱ्या पाळीचे वेळापत्रक तयार केले. त्यामुळे कामगार वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

कामगारांनी कंपनीमध्ये सत्यनारायणाच्या पूजेचे आयोजन केले होते. यावेळी कामगारांनी पूजेसाठी उपस्थित कामगार नेते महेंद्र घरत यांचे भलीमोठी श्रीकृष्णाची मूर्ती भेट देऊन जंगी स्वागत केले व कामगार क्षेत्रात महेंद्र घरत यांच्या शिवाय पर्याय नाही असे गौरवोद्गार काढले.

# वन कर्मचाऱ्यांच्या टाइम बाँण्ड समस्याचा अन्याय दूर करणार : आ.विजय गावित

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

वन कर्मचाऱ्यांच्या टाइम बाँण्ड समस्याचा अन्याय दूर करणार असल्याचे आश्वासन रा.जि.पालकमंत्री ना.आदिती तटकरे व परभणी मा.आ.विजय गव्हाण यांनी वन कर्मचाऱ्यांच्या एका सभेत वन कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे.



रा.जि.वन अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत दाद मिळवण्यासाठी व न्याय मिळवून देण्यासाठी आपल्या समस्या ल प्रश्न पालकमंत्री आदिती तटकरे व मा.आ.विजय गव्हाण यांच्यासमोर मांडल्या असता त्यांनी तशाप्रकारचे अश्वासन दिले आहे.

याबाबत अधिक माहिती देताना सेवानिवृत्त वनपाल शंकर धनावडे यांनी महाराष्ट्राचे वनपाल संदर्भात कर्मचा–यांवर २० वर्षे करबद्ध पदोन्नती, अश्वासित प्रगत योजना, व १०.२० व ३० लाभ देणे, अतिप्रगत रक्कमा कर्मचाऱ्यांना परत करणे, व पेन्शनमधून लसूल होणाऱ्या अतिप्रदान रक्कमा थांबविणे याबाबत विचारविनिमय सभा १ मे २०२१ रोजी पनवेल येथे क्षणभर विश्रांती येथील सभागृहात संपन्न करण्यात आली असल्याचे सांगताना या सभेमध्ये परभणी मा.आ.विजय गव्हाण यांनी संबोधित करताना उपवित्त कर्मचाऱ्यांना ग्वाही दिली.

विशेषतः पालकमंत्री आदिती तटकरे यांनी मंत्रालयात झालेल्या सभेमध्ये सन १९७६ च्या सेवा शर्तप्रमाणे रूजू झालेल्या कर्मचाऱ्यांना सन १९८७ ते १९९८ चे अधिसुचनेचे निकष कर्मचाऱ्यांना सेवा प्राप्तीच्या उंबरठ्यावर असताना लावतात कसे या पालकमंत्र्यांच्या आदेशाचा उल्लेख केला व वरिष्ठ पदावर काम करणा–या कर्मचाऱ्यांना कमी वेतन व पेन्शन तर कनिष्ठ कर्मचाऱ्यांना ज्यादा वेतन व पेन्शन हा अन्याय लवकरात लवकर दूर करावा असे वनराज्यमंत्री भरणे साहेब यांच्या आदेशाचा देखील त्यांनी उल्लेख केला व स्वतः कर्मचाऱ्यांच्या पाठिशी उभे राहून कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांवर होणाऱ्या अन्यायाचा लवकरच लवकर पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. त्यामुळे कर्मचारी वर्गानी समाधान व्यक्त केले असल्याचे शेवटी सेवानिवृत्त वनपाल शंकर धनावडे यांनी सांगितले.

या सभेस खारकर, म्हात्रे, माने, जांभळे, गोवंड, अंबाजी, कडवे, राठोड, जगताप, संखे, पाटील, बेहेरे, पवार, कड, ढसाळ, भोंडे, पगारे, झोमण, गुरखा, बोंडाळकर, पवार आदी राज्यातील रायगड,रत्नागिरी, ठाणे, पालघर, सावंतवाडी, पूणे, नाशिक, मालेगाव आदी ठिकाणचे वन अधिकारी तथा कर्मचारी उपस्थित होते. या सभेचे प्रास्ताविक बि.के.गोरनाख यांनी केले तर सुत्रसंचलन शंकर धनावडे यांनी करून निकिते यांनी अनुमोदन दिले.